# महासागर वृत्तसागर

नागपूर

■ शनिवार, दि. २२, फेब्रुवारी २०२५ ■


## गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

■ **महासागर प्रतिनिधी, कोंढाळी, दि. २१ :** कोंढाळीतील शनिवारपेठ येथे राहणा-या अनय अनिल वड्याळकर (20)याने गुरूवार (दि.20) ला पहाटे 4ते 6 चे सुमारास पंख्याला नायलॉन दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली.

अनय अनिल वड्याळकर हा गेल्या अनेक वर्षांपासून आजी आजोबांकडे राहात होता त्यामुळे वयोवृद्ध आजी आजोबा सांभाळीत होते, अनय हा रोज फिरायला जात असल्याने गुरूवार (दि.20)ला पहाटे 5चे सुमारास त्याचे मित्रांनी वारंवार फोन केले परंतु प्रतिसाद मिळत नसल्याने मित्रांना त्याचे घरी जावून खिडकीतून पाहले असता तो पंख्याचा लटकलेल्या अवस्थेत दिसला. लगेच दुस-या खोलीत असलेल्या आजी आजोबांना माहिती दिली. त्यांनी रूमचा दरवाजा तोडून पाहले असता तो मृतावस्थेत आढळून आला. लगेच याची माहिती पोलीसांना दिली. घटनेची माहिती मिळताच कोंढाळीचे



ठाणेदार राजकुमार त्रिपाठी ऑन डिवटी शैलेश नागरे व स्टाफ सह घटनास्थळी पोहोचले व मृतकाचा घटना स्थळ पंचनामा करून मृतदेह विच्छेदनासाठी काटोल ग्रामीण रूग्णालयात पाठविण्यात आला. अनयने आत्महत्या का केली याचे कारण कळू शकले नाही. पुढील तपास पोहवा नितेश राठोड व सुनिल मोरे करत आहेत.

# सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधलेला पूल उद्घाटनाच्या दुसऱ्याच दिवशी खचला

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :** केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या खात्याने बांधलेला पूर्व नागपुरातील उड्डाणपूल उद्घाटनाच्या दुसऱ्याच दिवशी खचल्याने खळबळ उडाली. या पुलाचा प्लास्टर आणि सिमेंट काँक्रीटचा तुकडा एका कारवर कोसळला, सुदैवाने जीवितहानी झाली नाही.

गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेला पारडी उड्डाणपूल काल, गुरुवारी वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. पूर्व नागपूरचे आमदार कृष्णा खोपडे यांनी या उड्डाणपुलाचे लोकार्पण केले होते. आज सकाळी या पुलाचे प्लास्टर खचल्याची बाब समोर आली. कामठी मार्गावरील एका निमार्णाधीन पुलाचा भाग काही दिवसांपूर्वी खचला होता. शहरात सर्वत्र उड्डाणपुलाची कामे सुरू आहेत. पण, त्यांचा दर्जा निकृष्ट असल्याचा आरोप सर्वसामान्यांतून होत आहे. या पुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याची मागणी या भागातील नागरिकांनी केली आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ वरील बुटीबोरी उड्डाणपूलही दीड महिन्यांपूर्वी अशाचप्रकारे खचला होता. त्या पुलाची अद्याप दुरुस्ती झालेली नाही.

पारडी उड्डाणपुलाचे बांधकाम गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. भूमिपूजनाला सुमारे साडेनऊ वर्षे झालीत. बांधकाम सुरू होऊन साडेसात वर्षे पूर्ण झालीत. पारडी उड्डाणपुलाचे पूर्ण करण्याची अंतिम मुदत एनएचएआयने वारंवार पुढे ढकलली होती. या उड्डाणपुलाच्या तीन मार्गिका २०२३ मध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते वाहतुकीसाठी सुरू करण्यात आल्या होत्या. परंतु एचबी टाऊन, सेंट्रल एव्हेन्यूकडील मार्गिका आणि अंतर्गत रिंग रोडकडील मार्गिकेचे काम अपूर्ण होते. गेल्या अनेक वर्षांपासून हे काम सुरू होते. अखेर ते काम पूर्ण झाले आणि ही मार्गिका वाहतुकीसाठी खुली करण्यात आली. परंतु आज सकाळीच या पुलाचे प्लास्टर खचल्याने खळबळ उडाली. पूर्व नागपूर, मध्य नागपूर आणि दक्षिण नागपूरला जोडण्यासाठी व या भागात होणारी वाहनकोंडी लक्षात घेता पाच नवे उड्डाणपूल बांधण्यात येणार असून त्यासाठी ७९२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे. पूर्व, मध्य नागपूरला दक्षिण नागपूरशी जोडणाऱ्या रस्त्यांवर होणारी वाहनकोंडी व त्यामुळे होणारी नागरिकांची गैरसोय लक्षात घेता तेथे उड्डाणपुल बांधण्याची मागणी या भागातील आमदारांनी केली होती.

### शहरात आखणी पाच उड्डाणपूल

नागपुरात महारेल कंपनी पाच उड्डाणपूल उभारत आहे. रेशीमबाग ते के.डी.के. कॉलेज, टेलिफोन एक्सचेंज चौक ते भांडेप्लॉट (२५१ कोटी), चंद्रशेखर आझाद चौक ते मारवाडी चौक (६६कोटी), लकडगंज पोलीस ठाणे ते वर्धमाननगर (१३५ कोटी), नंदनवन, राजेंद्रनगर चौक ते हसनबाग चौक (६६ कोटी) आणि वर्धमाननगर ते निर्मलनगरी उमरेड रोड (२७४कोटी), या उड्डाणपुलांचा यात समावेश आहे.



## मजूराने केला आपल्या साथीदारावर कुऱ्हाडीने हल्ला

■ **महासागर प्रतिनिधी, कोंढाळी, दि. २१ :** कोंढाळी पासून 7 किमी अंतरावरील चिखली येथील शेतकरी सुरेश घनश्याम बलकी यांनी आपल्या शेतात मध्यप्रदेश येथील या दोन मजूराना कामा वर ठेवले होते दोघेही शेतातील शेतघरात राहत होते. काल दिनांक 19 फेब्रुवारी ला दोघेही कोंढाळीच्या आठवळी बाजारात बाजाराला आले परत येतांना सोबत दारूही आनली रात्री दारू पिवून जेवन केल्या नंतर दोघात जोरदार वाद झाला.

या वादात दिपचंदने बळीरामच्या डोके, पाठ व हाता वर कुऱ्हाडीने वार करून बळीराम ला गंभीर जखमी केले. त्यांला सोडून दिपचंद फरार झाला. आज सकाळी शेतमालक सुरेश बलकी जेव्हा शेतात गेले तेव्हा त्यांना बळीराम गंभीर घायळ अवस्थेत दिसला त्यांनी घटनेची माहिती चिखलीचे पोलीस पाटील कमलेश धोटे यांना दिली. कमलेश धोटे यांनी कोढाळी पोलीसांना माहिती दिली कोंढाळीचे ठाणेदार राजकुमार त्रिपाठी घटनास्थळी पोहोचले व गंभीर जखमी बळीराम वरठी याला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथे उपचारासाठी भरती केले. घटनास्थळावर काटोलचे उपविभागीय पोलीस अधिकारी बापूसाहेब रोहम हे सुध्दा पोहोचले.

कोंढाळी पोलिसांनी घटनास्थळावर डॉग स्कॉड व फॉरेन्सिक एक्सपर्ट यांनाही बोलावले व आरोपीच्या शोध सुरू केला उन्हाळी पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे चिखली मासोद शिवारातील जंगलातून आरोपी दिपचंद पन्ना मसकोल्हे याला आज सायंकाळी अटक केली आहे.

# महाराष्ट्र युनिव्हर्सिटी अँन्ड कॉलेज लायब्ररीयन्स असोसिएशनची ८ वी राष्ट्रीय परीषद आजपासून

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :** महाराष्ट्र युनिव्हर्सिटी अँन्ड कॉलेज लायब्ररीयन्स असोसिएशनची आठवी राष्ट्रीय परीषद 22 व 23 फेब्रुवारी 2025 दरम्यान विमलाबाई देशमुख ऑडिटोरीयम, धनवटे नॅशनल कॉलेज परीसर, नागपुर या ठिकाणी होणार आहे. सदर परीषद राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ सेक्शनल कौन्सिल व्दारे इंडियन्स लायब्ररी असोसिएशन, न्यू दिल्ली, ज्ञान स्त्रोत केन्द्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठः आणि ज्ञान स्त्रोत केन्द्र, कवी कुलगुरु संस्कृत विद्यापीठ, रामटेक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित होत आहे.




ग्रंथालयाच्या दैनंदिन कामकाजात उद्भवणा-या समस्या तसेच त्यांच्या व्यवसायाशी निगडीत प्रश्नांबाबत एकत्रित चर्चा करुन त्याचे निराकरण शासन स्तरावर करण्याकरीता एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उद्देशाने मुक्ला संघटनेची स्थापना करण्यात आलेली आहे.

दि. 22 व 23 फेब्रुवारी 2025 दरम्यान नागपुर येथे होऊ घातलेल्या महाराष्ट्र युनिव्हर्सिटी अँन्ड कॉलेज लायब्ररीयन्स असोसिएशन च्या आठव्या राष्ट्रीय परीषदेचे उद्घाटन डॉ. हरेराम त्रिपाठी, कुलगुरु, कवी कुलगुरु संस्कृत विद्यापीठ, रामटेक यांचे हस्ते दि. 22 रोजी सकाळी 10.00 वाजता संपन्न होत आहे. या प्रसंगी डॉ मोहन खेरडे अध्यक्ष, इंडियन लायब्ररी असोसिएशन, न्यू दिल्ली हे अध्यक्ष स्थानी असतील तर मा डॉ. प्रशांत बोकारे, कुलगुरु राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठः प्रमुख अतिथि म्हणून उपस्थित असतील. या व्यतिरीक्त मा डॉ राजेन्द्र काकडे, प्र-कुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठः माडौं समय बनसोड, राज्यपाल नॉमिनीः डॉ. देवेन्द्र भोंगाडे, सदस्य व्यवस्थापन परिषदः आणि डॉ. धरमकुमार हे अतिथी असतील. तसेच डॉ. विनय पाटील, जनरल सेक्रेटरी मुकला हे उपस्थित राहतील तर डॉ. डी. आर. देशपांडे हे परिषद संचालक तर डॉ मंजू दुबे रॅपोच्युअर जनरल म्हणून काम पहातील.

विविध सत्रात डॉ. मंगला हिरवाडे, डॉ. प्रशांत देशमुख, डॉ. अस्विनी पराडकर, डॉ. विना प्रकाशे अध्यक्ष व डॉ. बद्धा नायडू, डॉ. संभाजी पाटील, डॉ. वैशाली वडनेरकर आणि डॉ. संजय साबळे हे तांत्रिक सत्राचे सह-अध्यक्ष राहतील तर डॉ. रमाकांत नवघरे, पनवेल, डॉ. रणजित पागोरे, बीड, डॉ. दतात्र्य काळबांडे, मुंबई, डॉ. रेवती खोकले अमरावती हे विषय तज्ञ म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन करतील.

परीषदेचे कन्व्हेनर डॉ. धनजय देवते आणि संयोजन सचिव डॉ.धनंजय गभणे, डॉ. दिपक कापडे, संचालक, ज्ञान खोत केन्द्र कवी कुलगुरु संस्कृत विद्यापीठ, रामटेक आणि डॉ. विजय खंडाळ, ज्ञान स्त्रोत केन्द्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या नेतृत्वात परीषद यशस्वी करण्यात डॉ. रमणिक लेनगुरे, डॉ. मंजू दुबे, डॉ. विजय डाखोळे डॉ. अजय आगाशे, डॉ. सारिका पाटील, डॉ. सुनील नारनवरे, डॉ. अरविंद भगत, डॉ. राजेंद्र माणिकपुरे, डॉ. भगवान ठवकर, डॉ. दिनकर तायवाडे, गजभिये, डॉ. सुधीर अस्तुनकर, डॉ. चंद्रशेखर हनवते हे अथक प्रयत्न करत आहेत.

## वाघाच्या शिकारीच्या चौकशीचा प्रगती अहवाल तीन आठवडयात सादर करा

**न्यायालयाची वनविभागाला तंबी**

**सीबीआय चौकशीचे संकेत**

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :** राज्यात आणि विशेषतः विदर्भात होत असलेल्या वाघाच्या अवैध शिकारीच्या प्रकरणाची मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने गंभीर दखल घेतली. उमरेड-कऱ्हांडला अभयारण्यात वाघांच्या झालेल्या अडवणुकीच्या प्रकरणानंतर उच्च न्यायालयाने स्वतःहून जनहित याचिका दाखल करून घेतली आहे. याचिकेवर न्या. नितीन सांबरे आणि न्या. वृषाली जोशी यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान न्यायलयीन मित्र अँड. सुधीर वोडितेल यांनी वाघांच्या अवैध शिकारीबाबत न्यायालयाचे लक्ष वेधले. मागील पाच वर्षात राज्यात १६० वाघांचा मृत्यू झाला आहे. यापैकी बहुतांश मृत्यू विदर्भ भागातील आहेत. वाघांच्या मृत्यू मागे अनेक कारण सांगितले जात असले तरी यामागे परराज्यातील शिकारी टोळी असल्याची माहिती अँड. वोडितेल यांनी दिली. मध्यप्रदेशातील शिकारी वाघांची शिकार करून मेघालय राज्याच्या सीमेतून म्यानमार देशात वाघाच्या अवयवांची तस्करी करतात.



राज्यात आणि विशेषतः विदर्भात होत असलेल्या वाघाच्या अवैध शिकारीच्या प्रकरणाची मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने गंभीर दखल घेतली. शिकारीच्या प्रकरणाची राज्य शासनाच्या वनविभागाकडून होत असल्याचा चौकशीचा प्रगती अहवाल तीन आठवड्यात न्यायालयात सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले. याप्रकरणात शेजारील मध्यप्रदेश राज्यातील गुन्हेगार सामील असल्याने हे प्रकरण सीबीआयकडे देण्याचे संकेतही न्यायालयाने सुनावणीदरम्यान दिले. याप्रकरणी राज्य वन विभागाकडून चौकशी केली जात आहे, मात्र यात प्रगती होत नसल्याने न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आणि सीलबंद प्रगती अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. शिकारीच्या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता न्यायालयाने याप्रकरणात सीबीआय, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण, वन्यजीव गुन्हे नियंत्रण विभाग, केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाला प्रतिवादी करण्याच्या सूचना केल्या. दरम्यान, पेंच व्याघ्र प्रकल्पात अवैध मासेमारी सुरू असल्याकडेही न्यायालयाचे लक्ष वेधण्यात आले. वनविभागाचा समूह कारवाईसाठी गेल्यावर त्यांच्यावर हल्ला झाला असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

वाघांच्या शिकारी प्रकरणाचे तार परराज्याशी जुळलेले आहे. याप्रकरणाची महाराष्ट्र राज्याकडून चौकशी केली जात आहे. या चौकशीत परराज्यातील पोलीस, महसूल आणि वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सहकार्य केले नाही तर उच्च न्यायालयाला हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाकडे वर्गीकृत करण्याशिवाय पर्याय राहणार नाही, असे न्यायालयाने निर्णयात स्पष्ट केले. वाघांची शिकार थांबवण्यासाठी राज्य शासन स्थानिक नागरिकांची कशाप्रकारे मदत घेऊ शकते, याबाबत धोरण तयार करण्याच्या सूचनाही न्यायालयाने केल्या. वरील सर्व बाबींची माहिती राज्याच्या अतिरिक्त प्रधान मुख्य वनसचिवांच्या निदर्शनास आणून देण्याचेही न्यायालयाने सांगितले.

## दृष्टीबाधितांसाठी वैशिष्ट्यपूर्ण बुद्धिबळ स्पर्धा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :** समाजात दिव्यांगांचा स्वीकार आणि समावेश होऊन सुसंवाद निर्माण व्हावा, या हेतुने 'आशादीप' अपंग, महिला- बाल विकास संस्था आणि चेस असोसिएशन, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने २२ फेब्रुवारी २०२५ रोजी विदर्भ संशोधन मंडळ, सिव्हिल लाइन्स,नागपूर येथे डोळस आणि दृष्टीबाधित यांच्यातील वैशिष्ट्यपूर्ण बुद्धिबळ स्पधेर्चे आयोजन करण्यात येत आहे. स्पर्धेचे उदघाटन सकाळी १० वाजता विदर्भ संशोधन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष पराग पांढरीपांडे यांच्या हस्ते होणार असून वासीसीईचे माजी प्राध्यापक डॉ. सुनील देशपांडे यांच्या उपस्थितीत दुपारी ४.३० वाजता समारोप होईल. आर्किटेक्ट राजेंद्र डोंगरे यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके वितरीत करण्यात येणार आहेत. या उपक्रमाला भेट देऊन खेळाडुंना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आशादीप अपंग, महिला - बाल विकास संस्थेच्या वतीने अध्यक्ष डॉ. प्रतिमा शास्त्री व सचिव अपर्णा कुळकर्णी यांनी केले आहे.

## १३ वर्षीय बालिकेवर अत्याचार

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :** परिसरात राहणाऱ्या 13 वर्षीय बालिकेला जाळ्यात अडकवून अत्याचार करणाऱ्या आरोपी विद्यार्थ्याला पोलिसांनी गुन्हा नोंदवून अटक केली. जयेश नरेश गभणे (21) रा. मंगलमूर्ती चौक, वानाडोंगरी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. पीडित बालिका आठव्या वर्गात शिकते. जयेश बी.कॉमच्या शेवटच्या वषार्ला आहे. शाळेत जाता-येता जयेश पीडितेशी बोलत होता. डिसेंबर महिन्यात त्याने पीडितेला प्रपोज केले. तिला प्रेमाच्या जाळ्यात अडकवले. निर्जनस्थळी घेऊन जात तो पीडितेवर अत्याचार करीत होता. गत दोन-तीन दिवसांपासून पीडितेच्या पोटात दुखत होते. तिने आईला याबाबत सांगितले. कुटुंबीयांनी तिला उपचारार्थ डॉक्टरकडे नेले. डॉक्टरने तपासून ती गर्भवती असल्याचे सांगितले. कुटुंबीयांनी विश्वासात घेऊन विचारपूस केली असता तिने जयशेचे नाव सांगितले.

# राज्यातील बालरक्षा अभियानाचा प्रारंभ

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :** राज्यातल्या मुलांच्या सुरक्षेच्या प्रश्नाची राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने गंभीर दखल घेतली असून याबाबतीत राज्यभर जनजागृती करण्याचा कार्यक्रम 'बालहक्क अभियान' ने हाती घेतला आहे.

या कार्यक्रमांतर्गत मुलांची सुरक्षा त्यांचे हक्क आणि मोठ्यांची कर्तव्ये याबाबतीत मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांना एकत्रितपणे प्रशिक्षित करून त्यांच्या माध्यमातून समाजामध्ये जाणीव जागृती व्हावी असा उद्देश यामागे आहे.




महाराष्ट्रातील 36 जिल्ह्यांपैकी नागपूर जिल्ह्यात सर्वप्रथम हा उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. जिल्हा परिषद प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सिद्धेश्वर काळुसे, माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी रोहिणी कुंभार आणि जिल्हा बालरक्षण समन्वयक यांच्या पुढाकाराने जिल्हा परिषदेची माजी शासकीय कन्या शाळा, काटोल रोड येथे पहिल्या प्रशिक्षणाचा उद्घाटन समारंभ संपन्न झाला.

बालरक्षा अभियानाच्या उद्घाटन प्रसंगी राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे सदस्य एडवोकेट संजय सेंगर हे प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांनी बालकांच्या हक्क, संरक्षण आणि न्यायाच्या संदर्भात नागपूर जिल्हा अव्वल असल्याचे मत व्यक्त करून नागपूर शिक्षण विभागाचे बालरक्षण समन्वयक यांनी जिल्ह्यातील मुलांसाठी काम करणाऱ्या विविध विभागांची सम्यक समन्वय ठेवला आहे. याबद्दल शिक्षण विभागाचे कौतुक केले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायाधीश सचिन पाटील यांनी, मुले ही राष्ट्रीय संपत्ती असून त्यांचे हक्क जपणे व त्यांचे संरक्षण करणे ही मोठ्यांची शासकीय यंत्रणांची आणि सरकारचीही जबाबदारी आहे असे मत व्यक्त केले. मार्गदर्शन केले.

### जिल्हा परिषद शिक्षण विभागाचा पुढाकार

जिल्हा बाल संरक्षण समितीच्या अध्यक्ष छाया गुरव यांनी मुलांच्या हक्कांसाठी बाल संरक्षण समिती सदैव तत्पर असल्याचा विश्वास पालकांना दिला. नागपूर अप्पर कामगार आयुक्त दीपक दहीफळकर यांनी मुले बालमजुरीला बळी पडणार नाहीत यासाठी आपण सजग असले पाहिजे. कामगार विभागासोबत जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग सहकार्य करीत असल्याने आपण समन्वयाने बलमजुरीवर मात करू शकू असा विश्वास व्यक्त केला. आणि जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रणजीत कुऱ्हे तसेच जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण आणि विनोद शेंडे हे उपस्थित होते.




# आरोग्य रोगनिदान शिबीराने छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव थाटात साजरा

■ महासागर प्रतिनिधी,
कन्हान, दि. २१ :

कन्हान शहर विकास मंच द्वारे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव निमित्त भव्य आरोग्य रोगनिदान शिबीर कार्यक्रमाचे आयोजन जुने कन्हान पोलीस स्टेशनच्या बाजुला हनुमान मंदिर परिसरात करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष कन्हन पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, प्रमुख अतिथि तेजस बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष चंद्रशेखर अरगुलेवार, समाजसेविका सौ.सुनिता मानकर सह आदि मान्यवरांचा हस्ते छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्प हार माल्यार्पण करुन शिबीर कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.



शिबीर कार्यक्रमात अरिहंत मल्टीस्पेशलिटी हॉस्पीटल नागपुरचे डॉ. अमिशा, डॉ.पल्लवी वरुळकर, डॉ. श्रेयस बानाबाकोडे, नर्स आचल, दिपाली, मथुर, मार्केटिंग हेड रजन जैन, दुर्गा मेश्राम सह आदि चंमुच्या सहकार्यानें एकुण १०० नागरिकांच्या आरोग्याची तपासणी करण्यात आली.

सह्याद्री संस्था नागपुर द्वारे प्रकल्प व्यवस्थापक नितेश नागदेवे, पर्यवेक्षक रुपेश सहारे, जया हिवसे, योगिता भुमरकर यांचा सहकार्याने एकुण ६० नागरिकांच्या एचआयव्ही, हिपॅटायटिस बी.सी, टीबी, एसटीआयची तपासणी करण्यात आली. कार्यक्रमात अरिहंत मल्टीस्पेशलिटी हॉस्पीटल नागपुरचे डॉक्टर, नर्स व सह्याद्री संस्था नागपुर यांचा वृक्ष देऊन सत्कार करुन छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुत्र संचालन मंच संस्थापक अध्यक्ष ऋषभ बावनकर यांनी केले आणि आभार हिमांशु सावरकर यांनी मानले.

या प्रसंगी जेष्ठ नागरिक मुलचंद शिंदेकर, नगरसेविका संगीता खोब्रागडे, कौशल्याताई गणोरकर, नालिनी साकोरे, वैशाली ठाकरे, जेष्ठ पत्रकार कमलसिंह यादव, विदर्भ गोल्डन न्यूज पेपरचे मुख्य संपादक एम.ए.जब्बार, आनंद सहारे, उमेश यादव, अमोल देऊळकर, जीवन मुंगले, महेंद्र साबरे, मयुर माटे, वामन देशमुख सह आदि नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता कन्हान शहर विकास मंच चे संस्थापक अध्यक्ष ऋषभ बावनकर, मार्गदर्शक भरत सावळे, ताराचंद निंबाळकर, हिमांशु सावरकर, सौरभ गावंडे, वेदांत राऊत, लोकेश दमाहे, आशिष राऊत , नाना ऊकेकर, मुकुल शिवारकर, कृणाल आगुटलेवार, चेतक पोटभरे, शैलेश चकोले, हर्षल सावरकर, जीवन नांदुरकर, भुषण खंते, साहिल सैय्यद, संजय तिवसकर, आदित्य बोरकर, शुभम बावनकर, उमेश मेश्राम, योगेश चकोले, बंडुजी इडपाते, शैलेश मोटु, श्रावण वाटकर, वेदांत भोडारे, हितेश राजपुत, सुजल यादव, आयुष संतापे, गौरव राऊत, अभिषेक घरझाडे, सुशील कळमकर, सौरभ गुरुडे, रामलाल पट्टा, राजकुमार पटले, वामन पाहुणे यांनी सहकार्य केले.

# सरकारी कर्मचाऱ्यांचा सन्मान



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २१ :

आपले शासन आपल्या दारी हा कार्यक्रम काही दिवसांपूर्वी प्रभाग क्रमांक ५ बिनाकी मंगळवारी राष्ट्र संत तुकडोजी सभागृहात आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी शासनाच्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाला पाठिंबा दिला आणि सरकारी योजनांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले.

उत्तर नागपूरचे माजी आमदार डॉ. मिलिंद जी माने, तहसीलदार साबळे, रेचाजी, नगर भूमापन अधिकारी नलावडे, धामणकर, सुपारे, नगरपालिका अधिकारी जाधव, एमएससीबी अधिकारी आवारी, ठाकूर, मुस्कान वानखेडे, किशोर दुधे, आकाश शामकुवार, रोहित नंदनवार, सौरभ यादव, कमलेश बागडे, साक्षी दुधे, तलाठी पठाण, कनोजिया, पवार, वाचसुंदर इत्यादी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हा कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन त्यांचे आभार मानले.

माजी सभापती आणि नगरसेवक संजय चावरे, दीपसिंग दिग्वा, सुमित शाहू, राहुल तेलखडे, अब्बास भाई, नीलेश बोरेकर, हरीश वेंश्यानी, हुसेन भाई, स्वप्नील येरपुडे यांनी प्रयत्न केले आणि सर्वांचे आभार मानत, अशाच प्रकारच्या सार्वजनिक कामांमध्ये सहकार्य करण्याची विनंती केली.

# शिवजयंती प्रित्यर्थ शोभायात्रा व रक्तदान शिबिर



■ महासागर प्रतिनिधी,
काटोल, दि. २१ :

शिवजयंती महोत्सव समिती, काटोल तर्फे शहरातील सर्व क्रीडा मंडळ, युवा मंडळ, महिला मंडळ व सर्व संस्थेमिळून भव्य -दिव्य शिवजयंती महोत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

दि.19 फेब्रुवारी ला नगर परिषद शाळा क्र.2 च्या पटांगणावर सकाळी 9 ते रात्री 9 पर्यत भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये 151 रक्तदात्यांनी रक्तदान केले. तर दुपारी ५ वाजता भव्य शोभायात्रा काढण्यात आल. त्यात शिवस्वरूप ढोल -ताशा पथक, नागपूर हे विशेष आकर्षण होते. शोभायात्रेमध्ये जवळपास ५००० काटोलकरांनी सहपरीवार सहभाग घेतला.

## लेव्हल क्रॉसिंग गेट क्रमांक आज बंद

**नागपूर :** मध्य रेल्वे, नागपूर विभाग नागरिकांना कळवू इच्छितो की दहेगाव-कौठा येथील लेव्हल क्रॉसिंग गेट क्रमांक ८३ (किमी. ७३७/९-११ वर आणि १०-१२ खाली) २४ डिसेंबर रोजी बंद आहे. ते २२ फेब्रुवारी २०२५ (शनिवार) रोजी बंद होणार आहे. लिमिटेड हाईट सबवे यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे, त्यामुळे त्याची रस्ते आणि रेल्वे सुरक्षा मजबूत करणे आवश्यक आहे.

वाहतुकीचा कोणताही अडथळा टाळण्यासाठी आणि नागरिकांना पर्यायी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी, वाहतूक किमी ७३७/१४-१६ डाउन आणि १५-१३ अप या एलएचएस मार्गावरून वळवली जात आहे . हा पर्यायी मार्ग पूर्णपणे कार्यरत आहे आणि सर्व वाहतूकदारांना सुरक्षित आणि आरामदायी प्रवास प्रदान करेल.

# येरल्यात शिवजन्मोत्सव निमित्त लोकनृत्य कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २१ :

येरला येथील शिव स्वराज्य उत्सव समिती द्वारा शिवजन्मोत्सव निमीत्य लोकनृत्य व शिवगाथाचे आयोजन करण्यात आले. सर्वप्रथम आमदार समीर मेघे यांच्या हस्ते भोजराज घोरमाडे ,माजी उपसरपंच प्रमोद गमे चंद्रशेखर गमे यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.



पालखी सोहळा निमित्त गावातील युवक युवती यांनी साहसी शिव कालीन मैदानी खेळ सादर केले. दानपट्टा, लाठी काठी, लेझीम च्या तालात पालखी सोहळा पार झाला. यावेळी छत्रू झाडे, तेजराज बोढे, अंकित लोखंडे, कुणाल शेळके, पुष्कर राजपूत, अभिलाष जुनघरे, शैलेश वाघारे, ओम शेळके, विवेक झाडे, तेजस जुनघरे, यश जुनघरे, संस्कृती गमे, अंकिता जुनघरे, माधवी दाऊस्कर, गौरव गमे, अजय कोहळे, मीरा लांडे, शुभांगी इवनाथे, संतोष बनकर,रोशन गमे, आशिष जुनघरे, अनिकेत धुर्वे, रजत यादव, वीर बोढे, संचित लोखंडे, सुजल लोखंडे, दिनेश जुनघरे, नकुल मोहनिया, सुरेश जुनघरे, यादवराव टांगले, बबन गमे, मंगेश जुनघरे, योगीराज बोढे, राजकुमार गमे, राजेश टांगले, मुरलीधर पंधरे, कुंजीलाल परतेकी, श्रावण धुर्वे, मुकेश उईके, इचक्क दाऊस्कर, कमलेश येदुवंशी, प्रकाश पांडे, घनश्याम लोखंडे प्रणय मानकर, रोहित लोखंडे, कुणाल मिसाळ, राज इवनाते, अतुल भलावी, तुषार भलावी, आचल धुर्वे, ममता परतेकी, स्वाती मसराम, सुरज परतेकी, रमेश परतेकी, भोजराज जुनघरे, भूषण बुकाडे, दीपक चंद्रवंशी, विक्की चंद्रवंशी, सोनाली बोढे, वैशाली बोढे, छाया गमे,मीरा जुनघरे, राधा दाऊस्कर, लता गोदाबाई नरेंठीया, शोभा झाडे, गुंफा मसराम, कोमल जुनघरे, भारती लोखंडे, विजय ठाकूर, सतपाल उईके, लालता तिवारी, चेतना तिवारी, अश्विनी जुनघरे, बबन इंगोले, संजय तायडे, महादेव रेवसकर, शिव शंकर पांडे, सुरेश जुनघरे, दरेश चंद्रवंशी, गुलशन टांगले, वृषभ बुकाडे उपस्थित होते.

# स्वराज्य युवा प्रतिष्ठान तर्फे शिवजन्मोत्सव साजरा

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २१ :

आदर्श नगर येथे स्वराज्य युवा प्रतिष्ठान तर्फे अखंड हिंदूस्थानाचे आराध्य दैवत, स्वराज्य संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त शिवजन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला.सर्वप्रथम छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे अभिषेक करण्यात आले व सुवासिनी ने शिवजन्म पाळणा गायन करून प्रमुख अतिथींच्या हस्ते महाराजांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले.




शिवरायांची आरती करण्यात आली, परीसरातील लहान मुलांनी सुंदर नृत्य प्रस्तुती सादर केली.कार्यक्रमाचे आयोजन स्वराज्य युवा प्रतिष्ठानचे विशाल जोध, गिरीश जोध, आयुष बोबडे,निरज गोरे, नमन गोरे, वैभव डफरे, उज्वल बुरडे, रोहन डफरे, साहील धवने, आदित्य पाल,विकास जायभाये, यश अंबरते,मोहीनी जोध, श्यामली भेंडारकर, कल्याणी भेंडारकर यांनी सहकार्य केले.यावेळी समाजसेवक संदीप चरडे , विक्की चंद्रकांत लांडगे, श्यामराव सातपुते, त्र्यंबकराव टेकाडे, दामोधर जोध, नरेंद्र डफरे, संतोष पांडे , योगेश चरडे, प्रसाद गलांडे, अतुल भिवनकर, प्रतिक ठाकरे, शंतनु काळे, मनोज नासरे, प्रविण गडमाले, निशांत झाडे, वेदांत काळे हे उपस्थित होते.



# शिवाजी महाराजांची जयंती साजरी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २१ :

भारतीय जनता पक्ष, सेमिनरी हिल्स विभागाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त सेमिनरी हिल्स येथील व्हेटर्नरी कॉलेज चौकात शिवाजी जयंती साजरी केली. सर्व कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला आणि त्यांच्या स्तुतीसाठी घोषणा दिल्या.

विनोद बघेल, अशोक मिश्रा, येगेश निवेदी, नरेश ठाकूर, उदय मिश्रा, महादेव दमाहे, आठव तले नीलेश जुवार, अजय मश्राम, पापा कनौजिया सर्वांनी कार्यक्रम यशस्वी करण्यात महत्त्वाचे योगदान दिले.

# 'ऑपरेशन डिग्निटी' अंतर्गत आरपीएफ नागपूरने केली दोन जणांची सुटका

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २१ :

रेल्वे सुरक्षा दल, नागपूर पोस्ट आणि विभागीय सुरक्षा नियंत्रण कक्ष या दोघांनीही घटनेची जबाबदारी घेतली आणि एका अल्पवयीन मुलीला आणि एका मानसिकदृष्ट्या अस्थिर महिलेला सुरक्षित ठेवले आणि त्यांची सुरक्षा सुनिश्चित केली.

'ऑपरेशन नन्हे फरिश्ते' अंतर्गत, आरपीएफ कर्मचाऱ्यांनी नागपूर रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ६ वर ट्रेन क्रमांक १२८५९ मध्ये संशयास्पद परिस्थितीत प्रवास करणाऱ्या एका अल्पवयीन मुलीला शस्त्रे घेऊन जाताना पकडले. ते सुरक्षित ताब्यात घेण्यासाठी नागपूरच्या आरपीएफ स्टेशनमध्ये आणले जाते आणि आवश्यक कामानंतर सक्षम अधिकाऱ्यांकडे सोपवले जाते.

त्याचप्रमाणे, 'ऑपरेशन डिग्निटी' अंतर्गत, आरपीएफ नागपूरला एका मानसिकदृष्ट्या अस्थिर महिलेची माहिती मिळाली, जी सुरतमध्ये ट्रेनमध्ये चढणार होती. त्याला १२८४४ क्रमांकाच्या ट्रेनने सपदाली येथे आणण्यात आले आणि नंतर नागपूर येथील आरपीएफ स्टेशनवर सुरक्षितपणे आणण्यात आले. पडताळणीनंतर,




आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी लागेल आणि कुटुंबातील सदस्यांना एकत्र करावे लागेल. नागपूरच्या आरपीएफच्या टाटडीआयवर कारवाई करताना, स्थलांतरितांच्या सुरक्षिततेचा खरा चेहरा पाहणे आवश्यक आहे. अशा दुर्बल आणि गरजू लोकांना मदत करण्यासाठी आरपीएफ नेहमीच तयार असते आणि रेल्वे परिसर सुरक्षित ठेवण्यासाठी वचनबद्ध असते.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे (श.प.) शिवजयंती साजरी



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २१ :

हिंदवी स्वराज्य संस्थापक राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरातील शिवाजी महाराज यांच्या सिंहासनारुढ पुतळ्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ( शरद पवार गट ) यांच्या वतीने महाराजांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करुन विधिवत पूजन केले. यावेळी प्रदेश संघटक सरचिटणीस प्रेमनाथ झाडे, माजी नगरसेवक राजेश जयस्वाल, माजी नगरसेवक श्याम मंडपे, अशोक माने, योगेश चरडे, शहर अध्यक्ष वसंतराव ईखनकर, शहर कार्याध्यक्ष हिम्मत गडेकर, शहर कार्याध्यक्ष तथा जिल्हा सचिव दिनेश उईके, अशोक पैदलवार इत्यादींनी शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन केले.

# बेसा पिपळा नगर पंचायतचा वर्धापनदिन सोहळा

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. २१ :

बेसा पीपळा नगर परिषदच्या दोन दिवसीय वर्धापनदिन सोहळ्याचे आज(२२)पासून ओपन ग्राउंड, बेसा चौक येथे आयोजन करण्यात आले आहे.

आज सायंकाळी ६ वाजता (२२)पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते या सोहळ्याचे उद्घाटन करण्यात येईल. जिल्हाधिकारी विपीन इटनकर, माजी आमदार टेकचंद सावरकर यांची उपस्थिती राहणार आहे. ते २३ फरवरी २०२५ दरम्यान बेसा (पिपळा) नगर पंचायत चा दुसरा वर्धापन दिन सोहळा असून, या महोत्सवा मध्ये प्रामुख्याने ग्रामीण भागातील व तसेच शहरी भागातील गुणी कलावंताना त्यांची कला सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळावे व लोकांचे मनोरंजनासाठी हिंदी सिनेमा सृष्टी, मराठी चित्रपट सृष्टीतील नामवंत कलाकार यांना बोलावून लोकांचे मनोरंजन व्हावे, हा दृष्टीकोन लक्षात



घेत आपली संस्कृती आपण जपावी आणि तिला मोठ करून जनतेपुढे वर्षानुवर्षे सादर करत रहाव हेच उद्दिष्ट बाळगून या महोत्सवाचे आयोजन बेसा (पिपळा) नगर पंचायत द्वारे केलेले आहे.

सदर महोत्सवाची रूपरेषा बेसा (पिपळा) नगर पंचायतचे प्रशासक भारत नंदनवार यांनी आखली असून या महोत्सवाचे नियोजन पद्मावती फिल्म आणि इवेन्ट कंपनी करीत आहे.

या दोन दिवसीय कार्यक्रमात २२ फरवरी शनिवार ला उद्घाटन सोहळा पालक चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते होईल त्यानंतर लगेच लाईव कॉन्सर्ट इंडिअन आयडल फेम अबोली गिर्हे, अतिश तेलंग हे सुमधुर आवाजाने जनतेला मंत्रमुग्ध करतील त्याचप्रमाणे जनतेला भरभरून हसविण्यासाठी धमाल कॉमेडी मराठी चित्रपट सृष्टीतील नामवंत कलाकार चला हवा येऊ द्या फेम श्रेया बुगडे आणि भारत गणेशपुरे त्याचप्रमाणे चिन्मय उदगीरकर व प्रकाश भागवतकर यांचा कार्यक्रम सायंकाळी ६ ते १० वाजेपर्यंत होईल तर २३ फरवरी रविवार ला "कौन बनेगा डांस का सुपरस्टार "ज्यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील गुणी नृत्य कलाकार मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत, त्याचप्रमाणे बेसा (पिपळा) येथील महिलांचा सांस्कृतिक वेशभूषा परिधान करून फॅशन शो चे आयोजन केलेले आहे ज्यामध्ये महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणून मराठी/हिंदी सिनेमा सृष्टीतील आवडती व परिचयाची अभिनेत्री वर्षा उसगावकर यांची उपस्थिती राहील आहे. तसेच या महोत्सवामध्ये बिगबॉस हिंदी/मराठी फेम शिव ठाकरे हे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. या महोत्सवामध्ये महाराष्ट्रातील झी युवा युवा सिंगर एक नंबर फेम गायक चेतन लोखंडे यांच्या धमाकेदार आवाजाने सांगता होणार आहे. हा कार्यक्रम सायंकाळी ६ ते १० वाजेपर्यंत चालेल.

प्रशासक भारत नंदनवार यांच्या आधार प्रदर्शनाने या महोत्सवाचे समापन करतील. सोहळ्याला जास्तीत जास्त च्या संख्येने नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन मुख्याधिकारी भारत नंदनवार, अधिकारी कर्मचारी अजय वाघमारे, मोहित राजनकर, पूजा जाधव, विष्णू गायकवाड, विजय सुरवसे यांनी केले आहे.

## शिवाजी महाराज जगातील सर्वोत्तम संघटन कौशल्याचे जनक - अनिरुद्ध देवधर

**नागपूर :** सीताबर्डी मित्र मंडळच्या वतीने सीताबर्डी मेन रोड रिगल गेट वर शिव जन्मोत्सव सोहळा पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष धरमपेठ भाग संघचालक श्याम पत्तरकिने प्रमुख पाहुणे ऋतुजा गडकरी प्रमुख वक्ता अनिरुद्ध देवधर जेष्ठ कार्यकर्ते फुलमती अवचट उपस्थित होते. स्वराज्याची बांधनी करतांना शिवरायांच्या संघटन कौशल्याला जगात तोड नाही. देव देश आणि धमार्साठी अभूतपूर्व संघटन कौशल्याने स्वराज्याची शासन व्यवस्था उभी केली, असे देवधर म्हणाले. कार्यक्रमा प्रसंगी सीताबर्डी मित्र मंडळाचे अमोल तपासे, दिनेश गावंडे, प्रकाश माहुले, समीर अवधानी, विनोद माहुले, रेणुका नारनवरे, पुनम मोहबे, प्रतिभा अनिवाल, कविता पारधी, प्रिती यादव, उमेश नागभिडकर, अजय मुंजे, सतिष वैष्णव, धनंजय डेग्वेकर, महेश राठी, वरूण मेहाडिया, अमर पारधी, मुकेश मोहबे, सचिन अवधाने, राजेंद्र गुंड उपस्थित होते.

# कन्हान परिसरात ठिकठिकाणी शिवरायांचा जन्मोत्सव साजरा

■ महासागर प्रतिनिधी,
कन्हान, दि. २१ :

कन्हान, कांद्री परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव शोभायात्रा काढुन आणि महाप्रसाद वितरण करुन उत्साहात साजरा करण्यात आला.



**कांद्रीत शोभायात्रा काढुन शिवरायांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा**

शिवशाही ग्रुप कांद्री द्वारे छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव निमित्त शोभायात्रे चे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित कन्हान पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रतिमेला पुष्प हार अर्पण करुन शोभायात्रा काढण्यात आली. तरुण मुलांनी , मुलींनी आपल्या कलेचे प्रदर्शन करुन यात्रा कांद्री परिसरातील विविध मार्गाने भ्रमण करुन यात्रेचे कांद्री बस स्टॉप जवळ समापन करण्यात आले आणि महाप्रसाद वितरण करुन छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी शिवशाही ग्रुप कांद्रीचे संस्थापक अध्यक्ष चेतक पोटभरे, मयुर पोटभरे, दिनेश राऊत, हितेश बागतकर, जैयश वंजारी, आलोक मानकर, मंगेश पारधी, राजेश मांधरे, प्रणय बावनकुळे, ओम कुंभलकर, शुभम मेश्राम, तुषार गिरीपुंजे ,दुग्गु मालेवार , नेहा बागतकर, पिऊ वंजारी , प्रिया मानकर सह आदि नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

**महाप्रसाद वितरण करुन शिवरायांचा जन्मोत्सव थाटात साजरा**

अखिल भारतीय मराठा महासंघ द्वारे तारसा चौक येथे महाप्रसाद वितरण करुन शिवरायांचा जन्मोत्सव थाटात साजरा करण्यात आला. कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित अखिल भारतीय मराठा महासंघ नागपुर जिल्हा उपाध्यक्ष जितेंद्र धुमाळ आणि सामाजसेविका मोनाताई जंगम यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण आणि आरती करुन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. यावेळी मोनाताई जंगम, शुभांगी घोगले यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जीवन चरित्र्यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले आणि महाप्रसाद वितरण करुन शिवरायांचा जन्मोत्सव थाटात साजरा करण्यात आला . या प्रसंगी, इंदिरा धुमाळ, रामकृष्ण धुमाळ, माही मिरचे, शिल्पमं थोरात, माधवी मोरे, प्रमोद थोरात, संजय मिरचे, प्रश्मत जंगम, नितेश पाली अमित घारड, शशांक घोगले सह आदि नागरिक उपस्थित होते.

**राशन दुकानात शिवरायांना अभिवादन**

कन्हान शहरातील स्वामी विवेकानंद नगर परिसरात स्वप्नयोग स्वयंसहायता महिला बचत गट पि २३ राशन दुकानात बचतगट सर्व महिला व कार्ड धारक यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित समाजसेविका शारदा दुधबावने यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रतिमेला पुष्प हार अर्पण करण्यात आले . समाजसेविका सौ.सुनिता मानकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जीवन चरित्र्यावर उपस्थितांना मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रतिमेला पुष्प अर्पित करुन विनम्र अभिवादन करीत छत्रपती शिवाजी जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी सरीता स्वामी, वंदना निवाडे, लीला बर्वे, गीता साहारे, बींदु वाघमारे, नेहा तीजारे, शारदा मोहबे, अक्षवीनी मानकर, सह आदि कार्ड धारक प्रामुख्याने उपस्थित होते.

**येसंबा गावत शिवरायांना अभिवादन**

कन्हान परिसरातील येसंबा (सालवा) गावात छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव अभिवादन करुन साजरा करण्यात आला. कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित सामाजिक कार्यकर्ता आशिष राऊत यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रतिमेला पुष्प हार अर्पण करण्यात आले.

यावेळी नरेंद्र राऊत, सुनिल महल्ले, अमोल महल्ले यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जीवन चरित्र्यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रतिमेला पुष्प अर्पित करुन विनम्र अभिवादन करीत शिवरायांचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. या प्रसंगी नरेंद्र राऊत, सुनिल महाल्ले, मंगेश महाल्ले, बालचंद धुर्वे, यशवंत महाल्ले, अमोल महाल्ले, आशिष राऊत, देवेश महाल्ले, शुभम धुर्वे, गौरव राऊत, तेजस धुर्वे, गौरव महाल्ले, रूपेश राऊत, अभिषेक घरजाडे सह आदि नागरिक उपस्थित होते.

# श्री दत्तगुरु बालयोगी छोटू बाबांचा प्रकट दिवस उत्साहात संपन्न



■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. २१ :

नारायण टेकड़ी येथे सद्गुरू दरबारात प्रगट दिन १९ फेब्रुवारी ला मोठ्या हर्षोल्हासाने साजरा करण्यात आला. १८ फेब्रुवारीला सकाळी ९.०० वाजता दिप प्रज्वलनाने तसेच " ओम नमो नारायणाय " या अष्टाक्षरी महामंत्राच्या अखंड जपाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.तसेच १९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता श्री सद्गुरू नारायणस्वामी संजीवन समाधीचा महाभिषेक झाल्यावर अखंड जपाचे समापन होते.

त्यानंतर श्री दत्तगुरु छोटूबाबा समाधी मंडपात, श्री दत्तगुरूंची आरती व जयघोष झाल्यावर प्रगट दिनाचे पर्वावर श्री दत्तगुरूंचे मौलिक विचार ताई महाराज आपल्या प्रासादिक वाणीने भक्त भावीकांसमोर प्रगट केले.ताई महाराजांच्या श्री दत्तगुरुंच्या प्रचार प्रसारामुळे ही " नारायण टेकडी " आता " श्री दत्त टेकडी " म्हणून ओळखल्या जाते.

हजारोंच्या संख्येने भक्त भाविक निरनिराळ्या प्रांतातून, संपूर्ण भारतातून येथे दर्शनासाठी येतात.शिस्तबध्द पध्दतीने रांगेमध्ये उभे राहून सर्वजण सद्गुरु नारायणस्वामी संजीवनी समाधीचे तसेच श्री दत्तगुरु बालयोगी छोटूबाबा समाधीचे दर्शन घेतात.त्यानंतर ताईमहाराज यांचे प्रत्यक्ष दर्शन घेतल्यानंतर भव्य अशा प्रसाद भवनाकडे भक्तगण जातात.तेथे शांती पाठ केल्यावर सर्वजण आनंदाने महाप्रसादाचे सेवन करतात. दोन्ही समाधी स्थानी समाधीला माथा टेकवून,स्पर्श करून शांततेने दर्शन करण्याचे खरे सात्विक समाधान येथे मिळते.हे अतिशय जागृत स्थान आहे. समाधी स्थानी मौन दर्शनाने चित्ताची एकाग्रता साधते.त्याचबरोबर खऱ्या शांतीचा येथे अनुभव मिळतो असे भक्त गण म्हणतात.

## सांस्कृतीक कार्यक्रम व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २१ :

कळंबी येथे शिव छत्रपती गृप तर्फे छ्त्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमीत्य सांस्कृतीक कार्यक्रम व दहावी व बारावीमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांना रोख २ हजार रुपये व शिल्ड देण्यात आले. सर्वप्रथम छ्त्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पुजन करण्यात आले.

यावेळी पं. स. सदस्य विजय भांगे, सरपंच विनोद भोयर, उपसरपंच छ्त्रपती मोहोड, ग्रामपंचायत सदस्य अनिल डेहनकर, शामराव वरुडकर, सिकंदर गुरुनुले, कैलाश ढगे, राहुल डेहनकर,राहुल पाटील, चंद्रकांत खांबलकर, जितू बोडके, प्रशांत बावणे, रुपेश ठाकरे, देविदास गमे, ललित वरूडकर, महेश बावणे, महेश डेहनकर, बाबा चोधरी, अमोल भांगे, कुंधन बावणे उपस्थित होते.

# वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने सार्वजनिक क्षेत्रातील महिलांच्या ३५ व्या राष्ट्रीय परिषदेत दुसरा सर्वोत्तम उद्योग पुरस्कार जिंकला

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २१ :

नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे झालेल्या ३५ व्या राष्ट्रीय सार्वजनिक क्षेत्रातील महिला परिषदेत वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड ला दुसरा सर्वोत्कृष्ट उद्योग पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा प्रतिष्ठित पुरस्कार १३ सहभागींपैकी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडला प्रदान करण्यात आला.

महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया किशोर रहाटकर आणि SCOPE चे महासंचालक अतुल सोबती यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सार्वजनिक क्षेत्रातील महिला (पश्चिम प्रदेश) च्या अध्यक्षा अनुपमा टेमुरणीकर, मेधा हरदास, ज्योती वर्मा, सुश्री अंकिता घोष आणि इतर WIP सदस्यांनी हा पुरस्कार स्वीकारला.



पुरस्कार जिंकल्यानंतर, व्हीआयपीएस डब्ल्यूसीएल टीमने डब्ल्यूसीएलचे सीएमडी जे.यांचे आभार मानले. २१.०२.२०२५ रोजी जे. पी. द्विवेदी आणि संचालक (कार्मिक) डॉ. हेमंत शरद पांडे यांची भेट घेतली आणि त्यांना माज्या कामाबद्दल माहिती दिली. पी. द्विवेदी यांनी व्हीआयपीएस डब्ल्यूसीएलचे अभिनंदन केले आणि वर्षभर त्यांनी केलेल्या सकारात्मक कामाचे कौतुक केले. त्यांनी व्हीआयपीएसच्या सर्व सदस्यांना त्यांचे उत्कृष्ट काम सुरू ठेवण्यास सांगितले.

WIPS च्या राष्ट्रीय बैठकीत, सार्वजनिक क्षेत्रातील महिला (पश्चिम प्रदेश) अध्यक्षा आणि मुख्य व्यवस्थापक (मानव संसाधन विकास) अनुपमा टेमुरणीकर यांची आगामी २०२५-२०२७ या कालावधीसाठी हक्दर च्या राष्ट्रीय सरचिटणीस म्हणून निवड करण्यात आली आहे.

# सुभाषचंद्र बोस वाचनालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २१ :

महाराष्ट्र आराध्य दैवत व हिंदवी स्वराज्याचे प्रणेते छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती येथील देशगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस वाचनालय हिंगणा येथे अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.



याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर ऐतिहासिक महत्त्वाची आठवण करून मराठी मायभूमित त्यांची मूल्य, कर्तव्य, अधिकार, समानता, धर्मनिरपेक्ष महाराष्ट्र राज्य घडविण्यासाठी प्रेरणादायी योगदान असल्याचे वाचनालयाचे सचिव विठ्ठलराव कोहाड यांनी मार्गदर्शनपर भाषणात सांगीतले.

महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकला. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माजी जि.प. सदस्य दिनेशचंद्र बंग यांचे हस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करण्यात आले व महाराजांच्या जीवन चारित्र्यावर प्रकाश टाकुन कार्यक्रमाला उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी पं.स. सदस्य सुनिल बॉदाडे, प्रा.अतुल लामसोंगे, रायपुर ग्रामपंचायतच्या माजी उपसंरपंच दिपावली कोहाड, रमेश गोडबोले, रमेश ठाकुर मुख्याध यापक शांती निकेतन उच्च प्राथ. विद्यालय राजीव गांधीनगर, शरद वजरे संचालक (शार्प कॉम्प्युटर्सहिंगणा), दत्तात्रय अडयाळकर, ग्रा.पं. सदस्य गायत्री लारोकर, यांनी छत्रपती शिवाजी या कार्यक्रमाला प्रामुख्याने राजेश मोहोड, शफी शेटे, इंदुताई अलाम,स्विटीताई इटनकर, मंगलाताई इटनकर, प्रशांत नागोसे,मोतीरामजी कडू, युनुस शेटे, रामकृष्ण पौनिकर,ज्ञानेश्वर चुनारकर,शेख रमजुभाई आदी मान्यवर उपस्थित होते. यांप्रसंगी दत्तात्रय अड्याळकर यांनी प्रास्ताविक व सुत्रसंचालन केले.

# बेलोना येथे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती



■ महासागर प्रतिनिधी,
नरखेड, दि. २१ :

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त श्री राष्ट्रीय राजपूत करनी सेना शाखा बेलोना यांच्यातर्फे बाजार चौक येथे शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी राजपूत करणी सेनाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. शिवजयंती निमित्त गावातून ढोल ताशांच्या गजरात फटाक्याची आतिश बाजी करत भव्य मिरवणूक काढण्यात आली. तथा विविध संघटनेने सहकार्य केले.

राजपूत सेनेचे अध्यक्ष मुकेश चव्हाण, विजू राठोड, बैजू बनाफर, उपाध्यक्ष अजयपाल ठाकूर, पंकज नेनावत, जितू ठाकूर, युवा अध्यक्ष प्रमोद दिदावत,योगराज ठाकुर, पुरुषोत्तम राठोड,पवन ठाकूर, मर्यावत शैलेश राठोड निर्मल चव्हाण, नितेश खारपटे, आकाश दिदावत, दिनेश लोरीया, गुलजार बनाफर, आदी मान्यवर व गावातील असंख्य नागरिक उपस्थीत होते.

## नागरिक तक्रार निवारण दिनाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २१ :

शासन स्तरावरून सात कलमी कृती कार्यक्रम निश्चित करुन दिला आहे. या सात कलमी कार्यक्रमाअंतर्गत राज्यातील प्रशासनात येत्या 100 दिवसात प्राधान्याने करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर सूचना देण्यात आल्या आहे. त्या अनुषंगाने नागपूर येथील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण या कार्यालयामध्ये 20 फेब्रुवारी रोजी तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्या नागरिकांना त्यांच्या प्रलंबित कामाच्या तक्रारी मांडावयाच्या आहेत. त्यांनी तक्रार अर्ज घेऊन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रासमोर, श्रध्दानंदपेठ, नागपूर या ठिकाणी आहे.

# साई इंटरनॅशनल स्कुल येथे शिवाजी महाराज जयंती साजरी



■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. २१ :

साई इंटरनॅशनल स्कूल, शितलवाडी, रामटेक येथील विद्यार्थी व कर्मचारी वर्ग यांनी शाळेच्या प्रांगणात छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात व श्रद्धेने साजरी केली. तुषार चव्हाण यांच्या प्रास्ताविक व अमन दीक्षित यांच्या शिवगर्जनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी भाषणे करून महान छत्रपती शिवाजी महाराज यांच्या योगदानावर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनीही विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेतला आणि त्यांचे व्हिडिओ शाळेसोबत शेअर केले. प्राचार्य राजेंद्र मिश्रा यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेचे संचालक डॉ.विठ्ठल नागपूरे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

# शासकांनी शिवाजींपासून प्रेरणा घ्यावी : उत्तम शेवडे



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २१ :

छत्रपती शिवाजी महाराजांनी विविध जाती व विविध धमार्तील लोकांना समान न्याय दिला. त्यांनी कधीही भेद केला नाही. विशेषतः त्यांनी महिलांचा विशेष सन्मान केला. त्यामुळे त्यांचा वारसा सांगणाऱ्या आजच्या शासनकर्त्यांनी त्यांच्या पासून प्रेरणा घेऊन राज्याचा कारभार करावा असे आवाहन बसपा नेते उत्तम शेवडे यांनी केले.

ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या 395 व्या जयंती निमित्त नागपूर शहर बसपाच्या रामेश्वरी येथील कार्यालयात झालेल्या शिवजयंती समारंभात बोलत होते. याप्रसंगी बसपाच्या नागपूर जिल्हा प्रभारी रंजनाताई ढोरे, नागपूर जिल्हा महासचिव चंद्रशेखर कांबळे यांनी शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दक्षिण नागपूर विधानसभेचे अध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी, संचालन महासचिव सुमित जांभुळकर यांनी तर समापन कोषाध्यक्ष बालचंद जगताप यांनी केले.

# भारतीय कलाकार शाहीर मंडळातर्फे छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी




■ महासागर प्रतिनिधी,
कामठी, दि. २१ :

भारतीय कलाकार शाहीर मंडळ ऑल इंडिया तर्फे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात शाहीर डॉ राजेंद्र भीमराव बावनकुळे यांचे निवासस्थानी हनुमान नगर,कामठी येथे शूर विरांचे पोवाडे गायन करून साजरी करण्यात आली. सर्व प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्ती आणि फोटो ला पुष्पहार घालून पूजन करण्यात आले.

जय शिवाजी जय भवानी जय घोष करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ शाहीर चिरकूट पुंडेकर, शाहीर भगवान लांजेवार, शाहीर मधुकर शिंदे मेश्राम, शाहीर डॉ राजेंद्र बावनकुळे, शाहीर गजानन वडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि शूर वीरांचे पोवाडे गायन करून उत्साहात जयंती साजरी केली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक, गोयल टॉकीज कामठी येथे शाहिरी वेश भूषेत फेटे घालून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून मानाचा मुजरा करून जय घोष करण्यात आले.

यावेळी शाहीर डॉ. राजेंद्र बावनकुळे, शाहीर भगवान लांजेवार, शाहीर चिरकूट पुंडेकर, शाहीर मधुकर शिंदे मेश्राम, शाहीर गजानन वडे, हरिनाथ लेंडे, रायभान तेलंगे, बापूराव शिंदे मेश्राम, गिरीधर बावणे, श्रावण लांजेवार, रमेश गणोरकर, हिरालाल लुहुरे, छगन बावनकुळे, मोतीलाल सूर्यवंशी,सौ अरुणा बावनकुळे, सौ मीना कुंभलकर आणि शाहीर कलाकार उपस्थित होते.

# वाडीत प्रकट दिन उत्साहात



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २१ :

दत्तवाडी येथील गजानन सोसायटी मधील हायटेक कॅम्प्युटरमध्ये प्रकट दिनानिमीत्य संत गजानन महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन पत्रकार अरुण कराळे,हायटेक कॅम्प्युटरचे संचालक निलेश लांजेवार, संचालिका स्मिता लांजेवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.आयोजनासाठी हायटेक कॅम्प्युटरचे संचालक निलेश लांजेवार, संचालिका स्मिता लांजेवार, शिक्षिका पूजा जाधव,मेघा उंबरकर, प्रियांका अलकारी,योगिता चरपे, प्रियांका ठाकूर दीपाली गावड आदींनी सहकार्य केले. दत्तवाडी येथील गजानन सोसायटी मधील श्री संत गजानन महाराज देवस्थान मध्ये श्री संत गजानन महाराजांचा १४७ वा प्रगट दिवस निमीत्य सप्ताहाची सांगता गुरुवारी महाप्रसाने करण्यात आली.

आयोजनासाठी मंदिराचे विश्वस्त ॲड.श्रीराम बाटवे, प्रा.निवृत्ती पवार, सुनंदा भट्टलवार, तेजराव निघोट, राजेंद्र तिवारी, विश्वनाथ मुदलीआर, मुकुंद रंगदळे, ज्ञानेश्वर कोहळे, सौरभ टाले, मालती शिंदे, विजय शिंदे, प्रशांत कोरपे आदींनी सहकार्य

# तीन दिवसीय खडी गंमत महोत्सवाचा समारोप

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :

सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या खडीगंमत महोत्सवाचे अतिशय उत्कृष्ट आयोजन हिंगणा नागपूर येथे करण्यात आले.

सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून व विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली व बिभीषण चवरे यांच्या नियोजनाखाली या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.




शाहिरा बनसोडे यांच्या शाहिरीने व प्रबोधनाने या कार्यक्रमाची सुरवात झाली तर दुसऱ्या दिवशी शाहीर सेवक खडसे आणि संच यांनी अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावर उत्कृष्ट सादरीकरण केले. संत गाडगेबाबा यांनी अंधश्रद्धा आणि समाजातील वाईट चालीरीती व परंपरा यावर जोरदार प्रहार केला व समाजातल्या अनिष्ट रुढी व परंपरा दूर करण्याचा आपल्या कीर्तनाचा माध्यमातून संदेश दिला.

शाहीर ईश्वर पाटील यांनी साक्षरता अभियान यावर उत्कृष्ट कार्यक्रम सादर करून रसिकांची दाद मिळवली. छोटू मास्टर नक्कलकार यांनी आपल्या नकलीच्या जोरावर जनतेची मने जिंकली. महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी शाहीरा वृंदा मेश्राम यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक धोरण यावर कार्यक्रम सादर करून महाराजांचा जयंतीच्या पर्वावर अभिवादन केले तर शाहीर धन विजय यांनी बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक धोरण यावर कार्यक्रम सादर करून उपस्थितांना प्रबोधन केले तेव्हा सर्व रसिकांनी टाळ्या वाजवून शाहिरांना दाद दिली.

संदीप शेंडे, सहायक संचालक नागपूर विभाग, खडसे, कोवे यांच्या प्रमुख उपस्थित व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत शाहिरांचा सत्कार करून सर्व कलावंत रसिक प्रेक्षक व संपूर्ण जनतेचे सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

# मनपाच्या पर्यावरण प्रश्नांचा सिद्धेश कदम यांनी घेतला आढावा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :

नागपूर महानगरपालिकेद्वारे शहरात राबविण्यात येत असलेले पर्यावरण विषयक प्रकल्प आणि उद्भवणारे प्रश्न यासंदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी गुरुवारी (ता.२०) आढावा घेतला.

मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीतील आयुक्त सभा कक्षामध्ये आढावा बैठक पार पडली. बैठकीत मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, उपायुक्त विजय देशमुख, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, प्रदुषण निमंत्रण मंडळाच्या प्रादेशिक अधिकारी डॉ. हेमा देशपांडे, सहसंचालक रविन्द्र अंधाळे, परिवहन विभागाचे प्रशासकीय अधिकारी रवींद्र पागे, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, कार्यकारी अभियंता राजेश दुफारे यांच्यासह महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी उपस्थित होते.




बैठकीपूर्वी सिद्धेश कदम यांनी मनपाचे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, भांडेवाडी येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांना भेट देउन पाहणी केली.

बैठकीमध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष श्री. सिद्धेश कदम यांनी घनकचरा व्यवस्थापन, शहरातील सांडपाणी व्यवस्था व त्याची शुद्धीकरण यंत्रणा आणि त्या संदर्भातल्या भविष्यातील उपाययोजना, शहरातील नियोजित पाणीपुरवठा वाहिनीचा कृती आराखडा, सिंगल यूज प्लास्टिकमुळे होणारे प्रदूषण आणि त्याचबरोबर शहरातील हवा प्रदूषणाचा प्रश्न या विषयांचा आढावा घेतला व त्यावर सविस्तर चर्चा केली.

यावेळी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी नाग नदी, पिवळी नदी आणि पोहरा नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पाच्या कार्याची माहिती दिली. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात नदीमध्ये सांडपाण्याचा निचरा होउ नये यादृष्टीने कार्य करण्यात येत आहे. नदीच्या प्रवाहामध्ये मलवाहिन्यांचे पाणी सोडले जाउ नये याकरिता मलजलवाहिन्या बदलविण्यात येणार असल्याची देखील माहिती आयुक्तांनी दिली. या प्रकल्पाच्या कायासोबतच तात्पुरत्या उपाययोजना करण्याचे निर्देश सिद्धेश कदम यांनी दिले. मोठ्या शहरांमध्ये भेडसावणारी वायू प्रदूषणाची समस्या नागपूर शहरात भेडसावू नये यादृष्टीने उपाययोजना करण्याकडे लक्ष देण्याबाबत देखील कदम यांनी निर्देश दिले. राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम अंतर्गत दहन घाटांमधून होणारे प्रदूषण रोखण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे धोरण निर्धारित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

वाहनांमुळे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी नागपूर महानगरपालिकेला सहा रोड स्विपिंग मशीन उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले. सिंगल यूज प्लास्टिकचा वापर प्रतिबंधित करण्याबाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. सिंगल यूज प्लास्टिकचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्यासाठी मनपा आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने समन्वयाने काम करण्याचेही निर्देश सिद्धेश कदम यांनी दिले. त्यांनी मनपा आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संबंधित कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण आयोजित करण्याबाबत देखील त्यांनी निर्देश दिले.

# तिरळे कुणबी सेवा मंडळातर्फे शिवजयंती उत्सव

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :

तिरळे कुणबी सेवा मंडळ नागपूर च्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवजयंती उत्सव २०२५ बीडीपेठ आशीर्वाद नगर रिंग रोड येथील टाउन हॉल मध्ये शनिवारी 22 फेब्रुवारी ला सकाळी 10:30 वाजता शिवजयंती उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून तिरळे कुणबी मंडळाच्या कायार्ला पुन्हा उभारी देण्यासाठी समाजातील तरुण युवक-युवतींनी सहभागी व्हावे व अधिका -अधिक समाजाचे सदस्यत्व घ्यावे. असे आवाहन तरुण पिढीला केले गेले आहे.

तिरळे कुणबी सेवा मंडळाच्या वतीने युवक-युवतींना आवाहन करण्यात आले आहे की, जास्तीत जास्त मोठ्या संख्येने या कार्यक्रमात उपस्थित राहून सहकार्य करावे. तसेच युवकांनी सभासत्व स्वीकारावे. देणगी ठेवी देऊन संस्थेत आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी हातभार लावावा.

यावेळी समाजातिल नवनिर्वाचित आमदारांचा सत्कार करण्यात येईल. अध्यक्ष पी.बी.वाकडे पाटील यांनी पत्रपरिषदेत माहिती दिली. पत्रपरिषदेत मंचावरील उपस्थित पांडुरंग वाकडे पाटील, मधुकरराव घाटे, दीपक कापसे, महादेवराव बोराडे, नितीन हांडे, रवीप्रकाश ढोक, नरेशचंद्र वसु, श्रीमती विमलताई वाघमारे, बबनराव गांजरे, युवराज गुडधे आणि रवींद्र महल्ले यांची उपस्थिती होती.

## गुंड पवन तडीपार

**नागपूर :** शहरातील आणखी एका सराईत गुन्हेगाराला झोन 4 च्या डीसीपी रश्मिता राव यांनी एक वर्षासाठी तडीपार केले आहे. पवन गोपाल मिसाळ उर्फ पवन राजेश आर्य (21) रा. मनीषनगर असे तडीपार केलेल्या गुंडाचे नाव आहे. पवन हा अनेक वर्षांपासून गुन्हेगारीत सक्रीय आहे. त्याच्याविरुद्ध बेलतरोडी ठाण्यात गंभीर गुन्हे नोंद आहेत. पोलिसांनी त्याच्यावर प्रतिबंधक कारवाईही केली होती. त्यानंतरही तो सतत गुन्हेगारीत सक्रिय होता. त्याची लगाम कसण्यासाठी बेलतरोडीचे ठाणेदार मधुकर कवाडे यांनी तडीपारीचा प्रस्ताव तयार करून डीसीपी राव यांच्याकडे पाठवला. राव यांनी पवनचा गुन्हेगारी रेकॉर्ड पाहून त्याला एक वर्षासाठी नागपूर जिल्ह्यातून तडीपार करण्याचे आदेश दिले. त्याला वर्धा येथे नातेवाईकाकडे सोडण्यात आले आहे. या दरम्यान शहरात दिसल्यास नियंत्रण कक्ष किंवा बेलतरोडी पोलिसांना सूचना देण्याचे आवाहन करण्यात आले.

# कार चालवताना स्टंटबाजी पडली महागात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :

अमरावती मार्गावर रात्रीच्या सुमारास कारने जाणाऱ्या युवकांना स्टंटबाजी केली. या स्टंटबाजीचा व्हिडिओ काढून इंस्टाग्रामवर टाकला. तो व्हिडिओ पोलिसांच्या हाती लागला. पोलिसांनी त्या स्टंटबाज युवकांचा शोध घेऊन त्यांची वाहने जप्त केली. त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यासोबतच 10 हजारांचा दंड ठोठावून चांगलाच धडा शिकवला. वाहतूक पोलिसांनी आपल्या नागपूर पोलिस इंस्टाग्राम अकाऊंटवर त्या युवकांचा भविष्यात स्टंटबाजी करणार नाही, असा माफी मागतानाचा व्हिडिओ पोस्ट केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, 10 ते 12 तरुण 5 कारने फिरायला निघाले होते. अमरावती मार्गाने जात असताना त्या कारमधील काही तरुण कारच्या छतावर चढले होते तर काही खिडकीतून डोकावत हुल्लळबाजी करीत होते. कारचालकांनीही सीटबेल्ट लावलेला नव्हता. कोणीतरी या हुल्लळबाजीचे व्हिडिओ इंस्टाग्रामवर टाकले. काही तासांतच हे व्हिडिओ शहरातील अनेक व्हॉट्सअप ग्रूपमध्ये व्हायरल झाले.

एक व्हिडिओ वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त अर्चित चांडक यांच्यापर्यंतही पोहोचला. या प्रकरणाची त्यांनी दखल घेतली. त्यांनी या व्हिडिओतील स्टंटबाजी करणाऱ्या तरुणांवर कारवाई करण्याचे आणि कार जप्त करण्याच आदेश दिले.

### वाहतूक पोलिसांनी घेतला शोध

पोलिसांनी व्हिडिओमध्ये दिसणाऱ्या कारच्या नंबरप्लेटवरुन कारच्या मालकाचे नाव आणि पत्ता शोधून काढला. पत्त्यावर पोहोचून कार जप्त केली. तसेच कारमधील तरुणांचाही शोध घेतला. त्या सर्व तरुणांना वाहतूक उपायुक्त कार्यालयात आणण्यात आले. स्टंटबाजी करणाऱ्या तरुणांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

# सरस्वती शिशु मंदिरात दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ




■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :

केशव माधव शिक्षण संस्था द्वारा संचालित सरस्वती माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात दहावीच्या विद्यार्थ्यांना समारंभपूर्वक निरोप देण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून वनवासी कल्याण आश्रम नागपूरचे सहसचिव फिरोज उईके व राजेश बोंद्रे यांची उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी प्रशांत बोपर्डीकर होते तर कार्यकारिणी सदस्य वाघमारे, शाळेच्या मुख्याध्यापिका मृदुल भुते आणि मुख्याध्यापक राहुल गाडगे देखील यावेळी उपस्थित होते.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. दहावीच्या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रत्येक विदयार्थ्याला शाळेकडून कार्डबोर्ड बक्षीस रुपात देण? यात आला. प्रशांत बोपर्डीकर यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या व अभ्यास कसा करावा याचे मार्गदर्शन केले. फिरोज उईके यांची विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मेहनतीला दुसरा पर्याय नाही. शॉर्टकटने यश प्राप्त करता येत नाही, असे ते म्हणाले. राजेश बोंद्रे यांनीदेखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व शुभेच्छा दिल्या. राहुल गाडगे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तन्वी पेटकर हिने केले.

# शिवजयंती निमित्त सोमवारी डॉ. नागेश गवळी यांचे व्याख्यान

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रातील महत्त्वाच्या घटना, त्यांचे प्रेरणादायी विचार आणि स्वराज्याची स्थापना करताना त्यांनी केलेल्या संघर्षावर प्रकाश टाकून महाराजांच्या शौयार्ची गाथा आणि त्यांच्या नेतृत्वाचे गुण सर्वांपर्यंत पोहचविण्यासाठी सोमवारी, दि. 24 फेब्रुवारी 2025 रोजी सायंकाळी 4 वाजता नागपूरमधील गड्डीगोदाम येथील प्रकाश भवन परिसरात सुप्रसिद्ध शिव व्याख्याते डॉ. नागेश गवळी आणि सप्तकंजारी वादक प्रबोधनकार मोहनदास चोरे यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण व पारेषण कंपनी नागपूर परिमंडल, छत्रपती शिवाजी महाराज जयंती महोत्सव समितीतर्फे आयोजीत या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महावितरणचे प्रादेशिक संचालक तर प्रमुख अतिथी म्हणून महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके आणि महापारेषणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता सतीश अणे हे उपस्थित राहतील. यावेळी अधीक्षक अभियंता अमित परांजपे, राजेश नाईक, संजय वाकडे, राकेश जनबंधू, मधुकर घुमे, मंगेश वैध्य आणि योगेंद्र निचत आदी मान्यवर उपस्थित राहतील. या व्याख्यानाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रातील महत्त्वाच्या घटना, त्यांचे प्रेरणादायी विचार आणि स्वराज्याची स्थापना करताना त्यांनी केलेल्या संघर्षावर प्रकाश टाकण्यात येईल. महाराजांच्या शौर्याची गाथा आणि त्यांच्या नेतृत्वाचे गुण सर्वांपर्यंत पोहोचवणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

## थेट कर्ज योजनेसाठी अर्ज आमंत्रित

**नागपूर :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत थेट कर्ज योजनेंतर्गत अनुसूचित जातीतील मांग व मातंग समाजातील बारा पोट जातीतील लाभार्थ्यांसाठी 50 टक्के उद्दिष्ट प्राप्त झाले असून इच्छुक लाभार्थ्यांनी 28 फेब्रुवारीपर्यंत जिल्हा कार्यालयात प्रत्यक्ष येऊन अर्ज घेऊन रितसर अर्ज सादर करावे. लाभार्थ्यांशिवाय इतर व्यक्तीकडून अर्ज स्वीकारण्यात येणार नाही. लाभार्थी निवड चिठ्ठी काढून लॉटरी पध्दतीने करण्यात येईल. यांची लाभार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी कळविले आहे.

# गोंडी भाषा, साहित्य व संस्कृतीच्या अस्तित्वासाठी आपल्या लेखणीतून लढा देणाऱ्या उषाकिरण आत्राम

■ सुजाता बंडावार, नागपूर, दि. २१ :

पृथ्वीवर मानव निर्मिती झाली तेव्हापासून अस्तित्वात असणारी अति प्राचीन गोंडी भाषा, संस्कृती, त्यांच्या सामाजिक संवेदना जनमानसापर्यंत पोहोचवून प्रचार व प्रसारासाठी आपल्या लेखणीद्वारे अविरत लढणाऱ्या महाराष्ट्रातील साठच्या दशकातील प्रथम कवयित्री, कथाकार, नाटककार, संपादक, समीक्षक म्हणून देशातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्यातनाम उषा किरण आत्राम यांनी आपल्या प्रतिभेची मोहोर उमटविली आहे. सहा कवितासंग्रह, दोन कथासंग्रह, दोन ऐतिहासिक पुस्तके, दोन संपादित ग्रंथ व नाटकांची साहित्य संपदा असणाऱ्या उषा किरण आत्राम यांनी अनेक राज्यस्तरीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पदच भूषविले नाही तर कित्येक मानाच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी त्या अलंकृत झालेल्या आहेत.

चंद्रपूर जिल्ह्यातील नंदोरी या छोट्याशा आदिवासी बहुल शेतकरी कुटुंबात दादाजी आत्राम व साळूबाई दादाजी आत्राम यांच्या पोटी जन्मलेल्या उषाकिरण आत्राम यांना वडिलांच्या सानिध्यात राहून साहित्याची आवड निर्माण झाली. वडील तुकाराम, ज्ञानेश्वरांचे अभंग, भजने गायचे. त्यातूनच त्यांच्यामध्ये शब्दसौंदर्यदृष्टी विकसित झाली व वयाच्या तिसऱ्या वर्षी त्यांनी जयंग जयंग रानात, झेंडूचे फुल माज्या कानात हे बालगीत लिहिले. तेव्हापासून ते आजतागायत त्यांनी लेखनाचा उचललेला विडा अजूनही अविरतपणे सुरू आहे. त्यांच्या महाविद्यालयीन जीवनात मार्गदर्शक म्हणून लाभलेले हिवरकर शिक्षक, लग्नानंतर त्यांचे पती सुन्हेर सिंह ताराम यांनी गोंडी भाषेविषयी निर्माण केलेली आवड व मार्गदर्शन तसेच गोंडी भाषेचे इतिहासतज्ञ व अभ्यासक डॉ. मोतीरावन कंगाली यांच्या सानिध्यात राहून त्यांनी गोंडी भाषा आत्मसातच केली नाही तर पतींनी गोंडवाना भाषा, साहित्य, संस्कृती, गोंडवाना भूभागाचा इतिहास यावर सुरू केलेल्या गोंडवाना दर्शन मासिक पत्रिकेतून लेखन सुरू केले.

1977 ला गडचिरोली जिल्ह्यात एटापल्ली येथे ग्रामसेविका म्हणून रुजू झालेल्या उषाकिरण आत्राम या आदिवासींच्या संपर्कात आल्या. त्यांनी माडिया, गोंडी, तेलगू या भाषांचे जवळून



अवलोकन केले. अशातच 1993 ला 56 कवितांचा समावेश असलेला मोत्यारीन हा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला. आदिवासींची जीवनसंस्कृती त्यांनी नोकरीच्या निमित्ताने जवळून पाहिली असल्याने गोंडी संस्कृती, त्यांची भाषा, महिलांचे कष्टमय जीवन व दुःख, त्यांच्या वेदना तसेच इतर ग्रामीण महिलांच्या समस्या त्यांनी या कवितांच्या माध्यमातून जनसामान्यांपर्यंत पोहोचविल्या. यानंतर 1996 मध्ये सहा कथांचा संग्रह असलेला अहेर हा कथासंग्रह त्यांनी प्रकाशित केला. या कथासंग्रहातून त्यांनी आदिवासींचा संघर्ष, जल, जंगल, जमीन यांच्यावरील त्यांचे अवलंबित्व, बहुजन समाजातील महिलांवर होणारे अत्याचार, वाईट प्रथा, हुंडाबळी यावर त्यांनी परखड लिखाण केले.

1800 वर्ष शासक म्हणून राहिलेल्या गोंडकालीन वंशावळीतील महाराण्यांचे शौर्य त्यांनी गोंडवाना की महान विरांगणाए यातून समाजासमोर आणले. या पुस्तकातून त्यांनी 13 गोंडवंशिय महाराण्यांची शौर्यगाथा व त्यांचा इतिहास यांचे दर्शन घडविले. चंद्रपूरला सहाय्यक बालविकास प्रकल्प अधिकारी म्हणून बढती मिळाल्यानंतर त्यांनी एक झोका आनंदाचा हा मराठी बालगीत संग्रह लिहिला ज्याला वा. गो. मायदेव नावाचा उत्कृष्ट वांग्मय निर्मितीचा पुरस्कार मिळाला. 2009 मध्ये 58 कवितांचा समावेश असलेला लेखणीच्या तलवारी हा मराठी कविता संग्रह अशाप्रकारे आतापर्यंत सहा कवितासंग्रह, दोन कथासंग्रह, दोन नाटके, दोन ऐतिहासिक पुस्तके व दोन संपादित ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. मुरमुराता नत्तुरी किस आम या त्यांच्या गोंडी कवितेने गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नाव नोंदविले आहे. त्या इथेच थांबल्या नाहीत तर येत्या काळात गोंडी लोक साहित्यावर त्यांचे पुस्तक येत असून माट्या हा वैचारिक लेखसंग्रह, ओली जखम हे त्यांचे व कतरा कतरा जिंदगी हे त्यांच्या पतीचे आत्मकथन त्या लिहिणार आहेत.

त्यांच्या या प्रवासात त्यांनी अखिल भारतीय आदिवासी साहित्य संमेलनाचे नागपूरला अध्यक्ष पद भूषविले आहे. यासोबतच दहा विविध राज्यस्तरीय साहित्य संमेलनाचे, आंबेडकरी विचार साहित्य संमेलनाचे, महिला संमेलन व विविध चर्चांचे अध्यक्ष पद भूषविले आहे. गोंडी भाषा संस्कृती संरक्षण व संवर्धनाच्या त्यांच्या या लढ्यात त्यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी अलंकृत केल्या गेले आहे. यामध्ये 2001 चा जीवन मित्र पुरस्कार, आंबेडकर फेलोशिप दिल्ली, 2001 चा महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार, मधुकर केचे पुरस्कार, बडोदरा काव्य पुरस्कार, ज्येष्ठ लेखिका पुरस्कार, तसेच गोंडवाना गौरव पुरस्कार मध्य प्रदेश, महाराणी दुर्गावती पुरस्कार हे अंतरराज्यीय व रमणीका फाउंडेशन दिल्ली हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळवून त्या देशपातळीवरच नाही तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही प्रसिद्धीस आल्या.

पण या पुरस्कारांनी भारावून न जाता आपला लढा कायम ठेवत त्या गोंदिया जिल्ह्यात कचारगड येथे आदिवासी भाषांवर शोध केंद्राची निर्मिती करून शोध कार्य स्वतःच्या खर्चाने करीत आहेत. त्यांच्या अभ्यासक्रमावर अनेक विद्यार्थी पीएचडी करीत असून त्यांचे साहित्य देशातील विविध विद्यापीठांमध्ये अभ्यासाला आहेत. यासोबतच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होऊन त्या आपले उत्तरदायित्व पूर्ण करीत आहेत. त्या वृत्तपत्राच्या माध्यमातून सांगू इच्छितात की द्रविड भाषांची जननी असलेल्या अवार्चीन गोंडी भाषेला आठव्या अनुसूची मध्ये स्थान मिळावे. याशिवाय साहित्य अकादमी व साहित्य संमेलना सारख्या देशव्यापी मंचावर गोंडी साहित्यिकांना व साहित्याला व्यापक संधी मिळायला हवी. गोंडी भाषेसोबतच विविध आदिवासी भाषांच्या प्रचार व प्रसारासाठी तसेच संस्कृती रक्षणासाठी आपल्या लेखणीचे शस्त्र उचलणाऱ्या या हरहुन्नरी, प्रतिभा संपन्न कवयित्री व लेखिकेला आमच्या शुभेच्छा.

# नवप्रतिभा हायस्कूलमधील १९९० च्या बॅचकडून एक दिवसीय वर्ग शाळा थाटात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :

जीवन विकास एज्युकेशन सोसायटी च्यावतीने चालविण्यात येणा?या श्री बाबुरावजी झाडे नवप्रतिभा हायस्कूलमध्ये १९९० च्या वर्ग मित्रांकडून स्नेहमिलन कार्यक्रमाअंतर्गत नुकत्याच झालेल्या १६ फरवरी रोजी एक दिवसीय वर्ग शाळा घेण्यात आली.



या कार्यक्रमाचे उद्घाटन शिक्षण महर्षी संस्थेचे संस्थापक कार्याध्यक्ष तथा तत्कालीन प्राचार्य बाबुरावजी झाडे यानी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव राजेंद्र झाडे संस्थेचे कोषाध्यक्ष बळवंतराव मोरघडे यांची प्रमुख उपस्थिती म्हणून १९९० च्या बॅच चे शिक्षक व शिक्षिका, सौ. वसुंधरा शेंडे वसंतराव झाडे, (उपाध्यक्ष जि.एज्यु.सो.) घनश्याम कामडी, अनिल देवगडे, आणी शाळेच्या मुख्याध्यापीका सौ. ज्योती गुल्हाने उपस्थित होत्या.

उद्द्घाटनानंतर या वर्गाची राष्ट्रगीताने सुरूवात करण्यात आली. यावेळी तत्कालीन विद्यार्थी नितिन झाडे, अविनाश शिंगणे, सुबोध कचकलवार, मनिष बोकडे, दिलीप काळे, सुशील पेरके, संजय मसने, राजेंद्र गिरी, अजय मसने, प्रदीप बावनकुळे, प्रकाश राऊत, प्रवीण बोकडे, राजेश गुणरकर, नेटू गव्हाणे, हरीष खुजे, संजय कोरे, सपना डुमरे (हाडगे), भवना बनकर (आंबूलकर) या माजी विद्यार्थ्यांनी स्वतःचा परिचय करून दिला व त्याच बरोबर शाळेतील आठवणी आणि शिक्षकां सोबत घलवलेल्या गोड कडू आठवणींना उजाळा दिल्या. प्रास्ताविक नितिन झाडे यांनी तर संचालन सपना डुमरे यानी तर आभार हरीष खुजे यानी मानले. या प्रसंगी सर्व तत्कालीन शिक्षकांना व माजी विद्यार्थ्यांना आठवण म्हणून स्मृती चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. उद्घाटक बाबुरावजी झाडे यानी सर्व माजी विद्यार्थ्यांना आपले आत्मचरीत्र "अजूनी चालतो ची वाट" भेट दिली व सर्वांना पुढील वाटचाली करीता शुभेच्छा दिल्या.